जा.क्र. पोआ/ २८०३/२०२०
पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
यांचे कार्यालय, दिनांक :-१४.०४.२०२०

विषय :- **फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४(१)(३)प्रमाणे दिनांक १५/०४/२०२० चे ००.०१ वा. ते दिनांक ३०.०४.२०२० चे २४.०० वा.चे दरम्यान संचारास मनाई आदेश.**

सुधारीत आदेश

२) ज्या अर्थी जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषीत केला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात महाराष्ट्रात ,पुणे शहरात गतीने पसरत आहे. असे दिसुन येत आहे. राज्य शासनाने कोरोना विषाणु (कोवीड - १९ ) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथींचे रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३/०३/२०२० पासुन लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केली आहे. त्याबाबतची नियमावली तयार केली आहे. या पार्श्वभुमीवर या कार्यालयाकडुन पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४(१)(३)प्रमाणे **दिनांक ०१/०४/२०२० चे ०० :०१ ते १४/०४/२०२० चे २४ :०० वा पर्यंत जमावबंदी आदेश अंमलात** आहेत. तसेच महाराष्ट्र शासनाने संदर्भ नं. डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-०१ दिनांक १३/०४/२०२० अन्वये अधिसुचना जारी करुन सुधारीत आदेशाव्दारे दिनांक २५/०३/२०२० रोजीचे लॉकडाऊन आदेशाची मुदत दिनांक ३०/०४/२०२० अखेर वाढविली आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक ०७/०४/२०२० क्रमांक कोरोना २०२०/प्रक.५८/आरोग्य /५ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या महाराष्ट्र कोव्हिड - १९ उपाययोजना नियम - २०२० अन्वये जारी अधिसुचनेनुसार पोलीस आयुक्त यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड - १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम प्राधिकारी म्हणुन घोषित केले आहे.परंतु ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरात काही भागात कोरोना बाधित रूग्णांची संख्या चिंताजनकरित्या वाढत आहे. या पार्श्वभुमीवर परस्पर संपर्कामुळे या विषाणुचा संसर्ग व प्रसार होण्याची शक्यता लक्षात घेता मानवी जिवीताला आरोग्याला किंवा सुरक्षिततेला संकट उत्पन्न होऊ शकते याची मला खात्री झालेली आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहरातील सदर भागात वरील नमुद आदेशात अंशतः बदल करून दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी अधिक गांभीर्याने व कडक स्वरूपात करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने सारासार विचार करून तातडीची प्रतिबंधक उपाययोजना करणेसाठी फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४ मधील तरतुदींच्या अनुषंगाने क्षेत्र प्रतिबंधक करणे, क्षेत्रातील नागरिकांचे आगमन व प्रस्थान प्रतिबंधित करणे, क्षेत्रातुन वाहनांचे आवागमन प्रतिबंधित करणेसाठी स्थानिक निवासी, अभ्यागत, वारंवार कामा निमीत्त पिंपरी चिंचवड शहरामध्ये प्रवेश करणारे यांना उद्देशुन आदेश काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झाली असल्याने जावक क्रमांक पोआ/२७३३/२०२०, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे कार्यालय दिनांक १०/०४/२०२० अन्वये फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४(१)(३)प्रमाणे **दिनांक १०/०४/२०२० चे २३.०० वा. ते दिनांक १४.०४.२०२० चे २४.०० वा.चे** दरम्यान संचारास मनाई आदेश जारी करण्यात आले असुन ते अंमलात आहेत. तरीही काही भागात बाधित रुग्णांच्या संख्येमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील बाधित रुग्णांची वाढ झालेल्या क्षेत्रात आदेश काढणे अत्यावश्यक असलेबाबत माझी खात्री झाली आहे.

३) त्याअर्थी **मी संदीप बिष्णोई, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड** तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन शासनाच्या दिनांक ०१.४.१९७४ चे अधिसुचनेद्वारे प्राधिकृत अधिकारी म्हणुन फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४(१) (३) अन्वये कोणत्याही व्यक्तीला पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्राच्या नमुद केलेल्या भागातील कोणत्याही रस्त्यावर, सार्वजनिक वाहतुकीचे रस्त्यावर, गल्लोगल्ली याठिकाणी संचार करणे, वाहतुक करणे, फिरणे, उभे राहणे, थांबुन राहणे, रेंगाळणे, सर्व कृत्यास परिच्छेद ०६ , ०७ व ०८ मधील तरतुदींच्या अधिन राहुन मनाई करणारा आदेश **दिनांक १५.०४.२०२० चे ००.०१ वा. ते दिनांक ३०.०४.२०२० चे २४.०० वा** चे दरम्यान लागु करीत आहेत.

४) उपरोक्त मनाई आदेश पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील खालील नमुद पोलीस ठाणे हद्दीअंतर्गत लागु राहील.

**अ)चिखली पोलीस स्टेशन** - शरदनगर- कॅसारीओ सोसायटी - नेवाळे वस्ती - स्पाईनरोड **या ठिकाणांचे आतील भाग व परिसर** त्यामध्ये घरकुल बिल्डींग क्रमांक ऐ १ ते १५८

**ब)पिंपरी पोलीस स्टेशन** - अॅक्सीस बँक एटीएम- भागवत गीता मंदिराचे पुर्वेकडील भाग - एमआयएम कार्यालयापासुन जामा मशिदकडील भाग -खराळआई मंदीराचे पश्चिमेकडील सर्व परिसर ज्यामध्ये - जामा मशिद , खराळवाडी भोवतीचा परिसर, पिंपरी - गिरमे हॉस्पीटल - अग्रेसन लायब्ररी - क्रिशा ट्रेडर्स - चैताली पार्कचे पश्चिमेकडील भाग - ओरीएन्टल बँकपाठीमागील भाग - सीटी प्राईड हॉटेल पाठीमागील भाग-क्रिस्टल कोर्ट हॉटेल पाठीमागील भाग

**क) दिघी पोलीस स्टेशन** - १) भागीरथी बिल्डिंग - साई पार्क रोड कॉलनी नं. १ - सिध्दीविनायक परांडेनगर कॉलनी नं. ३ - एम आर प्राईड बिल्डिंग - बालाजी मेडीकल या ठिकाणांचे **आतील भाग व परिसर** त्यामध्ये कमलराज बालाजी रेसीडेन्सी - रोडे हॉस्पीटल - एसव्हीएस कॉम्प्युटर - स्वरा गिफ्ट शॉपी - साई मंदीर रोड - अनुष्का ऑप्टीकल शॉप

२) अरुम वृंदावन सोसायटी समोरुन -बी यु भंडारी सोसायटी कडे जाणारा रस्ता ते श्रीराम कॉलनी प्रवेशव्दार ते गजानन महाराज नगर जोडणारा रस्ता ते बी. यु भंडारी सोसायटी कंम्पाऊड ते दत्त मंदीराचे आतील सर्व परिसर

**ड) वाकड पोलीस स्टेशन** - १) अक्षय चंदन हौसींग सोसायटी - किर्ती मेडिकल - संदीप मेडीकल - गोल्डन ज्वेलर्स - दुबई चाळ - निदान क्लिनिक - सुंदर कॉलनी - ऑर्कीड हॉस्पीटल - अशोका सोसायटी - काळेवाडी फाटा ब्रिज - व्हिक्टोरिया हॉटेल - गोकुळ स्वीटस - रानुबाई शाळा - गणराज कॉलनी - मोहटादेवी मंदीर - कैलासनगर व परिसर

२) बारणे वॉशिंग सेंटर - बारणे कॉर्नर - गीताई निवास - यशोदा आंगण सोसायटीचे आतील क्रांतीवीरनगर व परिसर.

**इ) भोसरी पोलीस स्टेशन** - १) चांदणी चौक (पी एम टी चौका जवळ) भोसरी (पुजा टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स) - भोसरी मेन रोड - मॉन्जिनिस केक शॉप - मेघना सोनोग्राफी सेंटर लांडेवाडी रोड - सार्वजनिक मुतारी - लांडे गिरणी - विनय सुपर मार्केट - आई तुळजाभवानी मंदीर - मारुती मंदीर - पुजा टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स

२)विनियर्ड चर्च परिसर दापोडी ( माता शितळा देवी मंदीर चौक - विनियर्ड चर्च - सुखवाणी ग्लोरी - पब्लिक फुड शेल्टर - धुम स्टार मेन्स पार्लर - पिंपळे गुरव रोड - माता शितळादेवी चौक)

३)डायमंड प्लास्टिक कंपनीजवळ कासारवाडी (सिध्दार्थ मोटर्स कासारवाडी - दत्तमंदीर पिंपळे भारत गॅस - सी एमई लॉन्ड्री - सिध्दार्थ मोटर्स कासारवाडी )

४)न्यु जनता बेकरी भोसरी ( आर जे बिकानेर स्वीट्स - भोसरी आळंदी रोड - उमेद स्वीट्स कॉर्नर - बालाजी टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स - प्रेरणा कॉम्प्युटर इन्स्टिटयुट - सदाशिव हाईट्स - नमो मेडिकल अॅन्ड जनरल स्टोअर्स - भोसरी फ्लॉयओव्हर )

५)गुरुदत्त कॉलनी गवळीनगर (गव्हाणे पेट्रोलपंप,-दुर्वांकुर लॉन्स-बनाचा ओढा-न्यु मिलान बेकर्स-हरि ओम स्वीटस-ममता स्वीटस कॉर्नर-सोळकी ज्वेलर्स-आनंद हॉस्पीटल)

वर नमुद परिसरामध्ये नागरिकांना प्रवेशबंदी तसेच परिसरातुन बाहेर पडण्यास बंदी करण्यात येत आहे.

**५) सदर मनाई आदेशांतून खालील प्रमाणे सवलतीचे निकष राहतील.**

**अ)**वरील मनाई आदेश पोलीस, संरक्षण दल, आरोग्य विभाग, दवाखाना, औषधालय, अत्यावस्थ रुग्णांची वाहतुक, कोरोना प्रतिबंधक उपाययोजनाअंतर्गत संबंधित पिंपरी चिंचवड मनपा व शासकीय सेवा, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी (कर्फ्यु पाससह) तसेच माझ्यावतीने संबंधित १) वपोनि. चिखली पोलीस स्टेशन २)वपोनि. पिंपरी पोलीस स्टेशन ३) वपोनि. दिघी पोलीस स्टेशन ४) वपोनि. वाकड पोलीस स्टेशन ५) वपोनि भोसरी पो.स्टे. यांनी परवानगी दिलेल्या व्यक्ती यांना लागू नसतील. मात्र त्यासाठी त्यांनी त्यांचे अधिकृत ओळखपत्र, आवश्यक कागदपत्रे व सदर विशेष कार्यासाठी नेमणुकीबाबतचे आदेश सोबत बाळगणे बंधनकारक असेल.

**ब)** वर नमुद प्रतिबंधित भागामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव अधिक असल्याचे निदर्शनास आल्याने येथील नागरिकांच्या हालचालींवर निर्बंध आणणे आवश्यक ठरले आहे. त्यामुळे सदर भागातील (परिच्छेद ०५ अ मधील नमुद व्यक्ती व सेवा वगळता) नागरिकांना विविध कारणांसाठी विविध शासकीय आस्थापनांकडून देण्यात आलेल्या वाहन वापर व वाहतुकीची सवलत रद्द करण्यात येत आहे.

**क**) परिच्छेद ०५ अ मधील नमुद व्यक्ती व सेवा वगळता इतरत्र कर्तव्यार्थ असलेल्या व्यक्तींना प्रतिबंधित क्षेत्रातून शहराच्या अन्य भागात प्रवास करणे आवश्यक असल्यास, अशा व्यक्तींची त्यांच्या कर्तव्याचे ठिकाणी वास्तव्याची सुविधा संबंधित आस्थापनांनी उपलब्ध करून दयावी. जेणेकरून कोरोना संक्रमणशील क्षेत्रातील त्यांच्या हालचालींवर निर्बंध घालणे शक्य होईल.

**६**) नागरिकांना दैनंदिन जीवनावश्यक वस्तू व सेवा खालीलप्रमाणे उपलब्ध होतील.

**अ**) परिच्छेद ४ मधील नमुद प्रतिबंधित भागातील जीवनावश्यक वस्तू व सेवा (दुध व दुग्धोत्पादन, किराणामाल, फळे व भाजीपाला इ.) पुरविणारी केंद्रे दिवसभरात केवळ तीन तास **(सकाळी ०८.०० ते ११.०० वा. पर्यंत)** ग्राहकांना विक्रीसाठी सुरू ठेवण्यास प्रशासनाकडुन परवानगी देण्यात येईल. तशी सविस्तर उद्‌घोषणा पी ए सिस्टीम वरुन करण्यात येईल. दरम्यान मुदतीत सीआरपीसी कलम १४४(१)(३)प्रमाणे दि. १५/०४/२०२० रोजी पारित केलेले व दि. ३०/०४/२०२० पर्यंत लागु करण्यात आलेले जमावबंदी आदेश अंमलात राहतील.

**ब**)जीवनावश्यक वस्तू व सेवा पुरविणा-या केंद्रांच्या ठिकाणी कोरोना विषाणुंचा प्रादुर्भाव टाळण्याकरिता जाणीवपुर्वक गर्दी टाळावी व त्यासाठी आवश्यक सामाजिक अंतराचे भान ठेवावे. अन्यथा पोलीसांकडून सदर दुकाने बंद करण्यास भाग पाडले जाईल. व नागरिकांना घरी परत जाण्याचे निर्देश दिले जातील. ग्राहकांना खरेदीसाठी उपलब्ध न झालेल्या कालावधीची भरपाई देण्याची तजवीज आवश्यकतेनुसार ठेवली जाईल.

**क**) नमुद प्रतिबंधित क्षेत्रातील नागरिकांच्या बँकींग सुविधांसाठी सर्व बँकांनी आपली केवळ ए.टी.एम केंद्रे कार्यान्वित ठेवावीत.

**७**) परिच्छेद क्रमांक ५ व ६ मध्ये नमुद सवलतीच्या निकषांची पुर्तता करतेवेळी सर्व संबंधितांनी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव टाळणेकरिता आरोग्य विभागाकडुन सुचित केलेल्या खबरदारीच्या उपायांचे **(उदा-मास्क, हॅण्डग्लोव्हज, सॅनिटायझर यांचा वापर तसेच सामाजिक अंतर ठेवणे)** काटेकोर पालन करणे अनिवार्य राहील.

**८**) सदर मनाई आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ५१ ते ६० नुसार आणि साथीचे रोग कायदा १८९७ तसेच प्रचलित कायदयातील तरतुदींनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**९**) उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. या बाबतची माहिती प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन, सहाय्यक पोलीस आयुक्त, तसेच परिमंडळीय पोलीस उप-आयुक्त कार्यालय यांचे नाटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्क्यानिशी आज दिनांक १४.०४.२०२० रोजी दिलेला आहे.

**(संदीप बिष्णोई)**
पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड

पोलीस आयुक्त
पिंपरी चिंचवड

**ठिकाण** :- पिंपरी चिंचवड
**दिनांक** :-१४.०४. २०२०